
# ८९ वे

# अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, बीड



## अध्यक्षीय भाषण : श्री. रामदास कामत

दिनांक : १३, १४ व १५ फेब्रुवारी २००९

अखिलभारतीय मराठी नाट्यपरिषद, मुंबई

# अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेतर्फे बीड येथे होणाऱ्या ८९ व्या नाटयसंमेलनाच्या अध्यक्षांचं भाषण

२६ नोव्हेंबर रोजी मुंबईला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शत्रूला मारता मारता शहीद झालेल्या शूरवीरांना माझे शतश: प्रणाम ! या धुमश्चक्रील बळी पडलेल्या निष्पाप जीवांना मी अंत:करणपूर्वक श्रध्दांजली अर्पण करतो !

रंगमंचावरील सर्व मान्यवर आणि रंगभूमीवर उदंड प्रेम करणारे उपस्थित नाटयरसिक मायबाप हो !

सर्वप्रथम मी रंगभूमीचे आराध्यदैवत श्री नटराज शंकर नटेश्वर, आणि माझे उपासना दैवत श्री दत्तात्रय महाराज यांना वंदन करतो. आजपर्यंत मी लेखकांच्या शब्दांना रंगभूमीवर सादर केले. आज मात्र माझ्या शब्दांनी मी नाट्य रसिकांशी संवाद साधणार आहे.

आज मराठवाडयातील बीड शहरात अखिल भारतीय मराठी नाटयसंमेलनाचे ८९ वे अधिवेशन मोठया थाटाने सुरू झाले आहे. यापूर्वी नाटयपरिषदेची ८८ नाटयसंमेलने झाली. दिल्लीपासून बेळगावपर्यंत आणि मुंबईपासून हैदराबाद पर्यंत अनेक ठिकाणी अशी संमेलने थाटामाटाने साजरी झाली. मराठवाडा ही संतांची पावनभूमी, भक्तिरसाची निर्मळ गंगा येथे दुथडी भरुन वाहते. तसेच मराठवाडयातील नाटयरसिकांनी आपली रंगभूमीवरील भक्ती आपुलकीने जोपासली आहे. यापूर्वी मराठवाड्यात नांदेड, परभणी, सोलापूर अशा अनेक ठिकाणी नाटयसंमेलने झाली.

मी अनेक नाट्य प्रयोगांसाठी मराठवाडयात आलो आणि मला असं दिसून आलं की या मराठवाड्यात प्रायोगिक, हौशी, व्यावसायिक, एवढच काय पण संगीत रंगभूमीची सेवा करणारे अनेक कलाकार आहेत, कुशल दिग्दर्शक आहेत. राज्यनाट्यस्पर्धेत मराठवाड्यातील रंगकर्मीनी आपला प्रभाव दाखवून दिला आहे. याशिवाय दिल्लीच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा मधून उत्तीर्ण होऊन आलेले सर्वश्री कमलाकर सोनटक्के, चंद्रकांत कुलकर्णी, वामन केंद्रे, लक्ष्मणराव देशपांडे यांनी आपल्या कर्तबगारीने मराठी रंगभूमीवर आपले महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

रसिकहो, नाटयसंमेलन म्हणजे नटराजाचा उत्सव, नाट्य-रसिकांची

याळी, नाटक या मराठी मनाच्या ठेव्याला यामधून प्रोत्साहन मिळते. या उपक्रमात भागी होण्यासाठी आपण सर्वजण जमलो आहोत. नट, नाटककार, दिग्दर्शक । नाट्यक्षेत्रातील वेगवेगळ्या आणि विविध स्तरातील महत्त्वपूर्ण व्यक्ती यानी चसंमेलनाचे अध्यक्षपद विभूषित केले आहे. शिवाय या पदावर संगीत रंगभूमीशी धीत दिग्गज व्यक्ती विराजमान झालेल्या आहेत. पं. विष्णु दिगंबर पलुस्करांपासून जितेंद्र अभिषेकींपर्यंत, बालगंधर्वांपासून छोटा गंधर्वांपर्यंत आणि जोत्स्ना भोळेंपासून माला शिलेदारांपर्यंत गायक गायिकांनी हे पद भूषविले आहे. मी त्यांचाच अनुस्वर हे, भक्त आहे, चाहता आहे. संगीत रंगभूमीचा एक सेवक म्हणून आज या यसंमेलनाचे अध्यक्षपद नाट्य परिषदेने मला देऊन माझा गौरव केला आहे. मुळे आज माझी मनस्थिती "धन्य आनंद दिन, पूर्ण ममकामना" अशी झाली हे. संगीत रंगभूमीचा एक सेवक म्हणून विनम्रभावाने मी हे पद स्वीकारीत आहे.

रसिकहो, मी गोमंतकाचा कलाकार. या निसर्गरम्य गोमंतकाने मराठी भूमीच्या कलाक्षेत्रात लक्षणीय योगदान दिले आहे. दीनानाथरावांची बलवंत संगीत ळी, रघुवीर सावकारांची "रंगबोधेच्छु" संगीत नाटक मंडळी, मो. ग. रांगणेकरांची यनिकेतन, प्रभाकर पणशीकरांची नाट्यसंपदा, आणि माझ्या मातृसंस्था धी गोवा ू असोसिएशन आणि गोपीनाथ सावकारांची कलामंदिर, या संस्थाचे योगदान नातीत आहे. मास्टर दीनानाथ, सावकार घराण्यातले रघुवीर सावकार, गोपीनाथ वकार, प्रसाद सावकार, मा. दत्ताराम, सुरेश हळदणकर, श्रीपाद नेवरेकर, जोत्स्ना ळे अशा अनेक कलावंतानी संगीताचा मधुरस्वर संगीत रंगभूमीला दिला.

मी गोमंतकीय कलाकार आहे. आतापर्यंत श्री. मो. ग. रांगणेक, श्रीमती ोत्स्ना भोळे, श्री. प्रभाकर पणशीकर, पं. जितेंद्र अभिषेकी, आणि या वर्षी मी ादास कामत, अशा अेंकदर पाच गोमंतकीयांना हा बहुमान प्राप्त झाला आहे. पं. तेंद्र अभिषेकी माझे नाट्य संगीतातले गुरु आहेत आणि अेका गुरुनंतर झ्यासारख्या त्यांच्या सत्‌शिष्याला हा मान मिळतो आहे, हा अपूर्व योग आहे असं ा वाटतं.

मी सुध्दा गोमंतकाचा एक कलाकार. लहानपणापासून नाटकाची आणि ण्याची उपजत आवड होती. गोमंतकात हौसेखातर नाटकात काम करण्यासाठी हेला रंग तोंडाला लावला तो केवळ मी सात वर्षांचा असताना. मी लहान असताना



माझ्या वडिलांनी विविध गाण्यातून राग ओळखायला शिकवलं. मुंबईला येऊन ग्रॅज्युएट झाल्यानंतर माझे वडिल बंधु, उपेंद्र कामत यांनी मला त्यांच्याकडे जवळजवळ १० वर्षे शास्त्रीय संगीत शिकवायला सुरुवात केली. शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. चरितार्थासाठी नोकरी करीत असताना माझ्या नाट्यकलेचा शोध घेऊन मला पहिली हाक दिली ती मुंबईतील अग्रगण्य अशा धी गोवा हिंदू असोसिएशन या संस्थेने. याच संस्थेने ५० वर्षापूर्वी महाराष्ट्र राज्यनाट्य स्पर्धेत भाग घेऊन अनेक नाटकांना प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धेतील संशयकल्लोळ, शारदा, मृच्छकटिक, या संगीतप्रधान नाटकात भूमिका करुन मी व्यावसायिक रंगभूमीवर प्रथम पाऊल ठेवले. गेली ५० वर्षे हा प्रवास चालू आहे. प्रगतीचा सोपान चढत चढत आज नाट्यपरिषदेच्या या सन्मानपदापर्यंत मी आलो आहे.

संगीत रंगभूमी हा माझा धर्म आहे आणि रंगभूमीवर भूमिका करणे हे माझे व्रत आहे असे मी मानतो. कर्तव्यबुध्दीने, निष्ठेने आणि प्रामाणिकपणे या क्षेत्रात मी वावरत राहिलो आणि अंगिकारलेल्या कार्यात कुठलीही कसूर केली नाही. म्हणूनच केवळ आज मला हे पद प्राप्त झाले आहे अशी माझी धारणा आहे. माझ्या गुणवत्तेपेक्षाही माझ्या गुरुजनांचा वरदहस्त, पुर्वसुरींचे व मार्गदर्शकांचे आशीर्वाद हेच मला इथपर्यंत पोहचण्यास कारणीभूत झालेले आहेत याची मला पूर्णपणे जाणीव आहे. माझे गानगुरु, कै. उपेंद्र कामत, कै. पं. गोविंदराव अग्नी, कै. पं. प्रभाकर भालेकर, पं. भिमसेन जोशी, नटश्रेष्ठ भालचंद्र पेंढारकर, पं. यशवंत देव आणि मुख्यत्वेकरुन कै. पं. जितेंद्र अभिषेकी यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त झालेली संगीत दिक्षा व ज्ञान हेच माझे संचित आहे. कै. गोपीनाथ सावकार आणि मो. ग. रांगणेकर यांनी मला नाट्य अभिनयाचे धडे दिले हे माझे धन आहे.

धी गोवा हिंदू असोसिएशनचे सेवाव्रती कार्यकर्ते श्री रामकृष्ण नायक आणि कै. अवधूत गुडे, जे मला वडिल बंधुसमान आहेत, त्यांनी माझी नाट्यकारकीर्द जोपासली आणि बहरायला मदत केली. या सर्व थोरामोठ्यांच्या चरणी लीन होऊन आज मी गाण्यांच नव्हे तर भाषणाचं सोंग वठवणार आहे.

रसिकहो, आज मराठी रंगभूमी सर्वांगानी बहरलेली आहे असं म्हटलं जातं. व्यावसायिक, प्रायोगिक, हौशी,समांतर रंगभूमी, बालरंगभूमी, कामगार रंगभूमी, दलित रंगभूमी अशा विविध नाट्यक्षेत्रात नवे नवे प्रयोग चालू आहेत. परंतु संगीत

रंगभूमीची पिछेहाट झालेली दिसते किंबहुना ती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे असं म्हटलं जातं. म्हणून आजच्या म्हणजे वर्तमानातील संगीत रंगभूमीला नवी उभारी कशी आणता येईल याचाच विचार सर्व प्रथम करायला हवा. महाराष्ट्र शासन आज संगीत रंगभूमीच्या मागे सढळ हाताने उभे आहे. आपल्या काही अडचणी असल्यास त्या त्यांच्यापुढे मांडून काही मार्ग सापडतो का ते पहायचे आहे

सध्या संगीत नाटकांचे प्रयोग होत नाहीत. त्यामुळे नाट्यसंगीत मागे पडल्यासारखे झाले आहे. बहुतेक संगीत नाटकं आणि नाट्यसंगीत प्रेमिकांच्या मनात नाट्य संगीत कालबाह्य झालय की कुवतबाह्य झालय, असा संभ्रम निर्माण झाला आहे. याचा ऊहापोह करण्याआधी संगीत नाटक आजच्या अवनतस्थितीला का व कसं पोचलं याचा विचार करणे आवश्यक आहे.

१८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांचं "संगीत शाकुंतल" नाटक रंगभूमीवर आलं आणि तेव्हापासून खऱ्या अर्थाने संगीत नाटकांचा जमाना सुरु झाला. किर्तनकार एखादं चरित्र / आख्यान सांगताना वीर रसात्मक, करुण रसात्मक वगैरे विविध रसांची गाणी प्रसंगाला अनुरुप अशा रागात गातो. ही गाणी साकी, दिंडी, कामदा, अंजनीगीत, कटाव वगैरे विविध वृत्तात असतात. शाकुंतल आणि त्यानंतर १९१० पर्यंत आलेल्या सौभद्र, शापसंभ्रम, मृच्छकटिक, शारदा वगैरे नाटकात पुष्कळशी गाणी याच वृत्तात रचली गेली.

संगीत नाटक चालू असताना गद्य नाटकंही जोरात चालू होती. असं असताना नाटकात गाण्याचा समावेश करण्याची आवश्यकता भासली याचं कारण चारपाच तास गद्य नाटक पाहणं कंटाळवाणं होण्याची शक्यता असते. म्हणून संगीत नाटकात पात्रांचं संभाषण, विचार, मनोगत वगैरे गाण्याच्या रुपात व्यक्त केले गेले. गाणी केवळ मनोरंजनासाठीच होती असं नव्हे, तर कित्येक वेळा भावभावनांची उत्कटता व्यक्त करायला गद्य कमी पडतं, तिथं संगीताचा वापर केल्यानं ती परिणामकरित्या व्यक्त करता येते.

१९१० पर्यंत आलेल्या संगीत नाटकात गद्य आणि संगीत समांतर रेषेत चालत होती. संगीत गद्याला पूरक होतं. कुरघोडी करत नव्हतं. एक आक्षेप घेतला जातो की जुन्या नाटकात खूपच म्हणजे दिडशे दोनशे गाणी आहेत. म्हणजे फारच झाली. पूर्वीच्याकाळी पाच साडेपाच तास चालणारी, विस्तारानं लिहीलेली नाटकं होती.



नाटकातले बरेचसे संवाद, विचार, भावभावना संगीताच्या रुपात आल्याकारणानं गाण्यांची संख्या जास्त होती तरी गायन मर्यादीत स्वरुपात होतं आणि ते संभाषण, विचार किंवा भावभावना व्यक्त करण्यापुरतच होतं.

१९११ ते १९३३ हा काळ नाट्यसंगीताचा सुवर्णकाळ मानला जातो. भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, गोविंदराव टेंबे, मा. कृष्णराव, अशासारख्या असामान्य गायकांनी दिलेल्या अभिजात संगीतातील उत्तमोत्तम चिजांवर आणि चालींवर गाणी बांधली गेली. ही नाटकं रंगभूमीवर येईपर्यंत शास्त्रीय संगीत फक्त विशिष्ट ठिकाणी थोड्याच लोकांना ऐकायला मिळत असे, तिथं सामान्य जनांना शिरकाव नव्हता, परंतु संगीत नाटकांच्या माध्यमातून शास्त्रीय संगीत नाट्यसंगीताच्या रुपात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सामन्यजनांपर्यंत पोचलं. मराठी प्रेक्षक नाट्यसंगीतावर लुब्ध झाले आणि संगीत नाटकावर अक्षरशः तुटून पडले. केशवराव भोसले, बालगंधर्व, मा. दीनानाथ, बापूसाहेब पेंढारकर असे मातब्बर गायक नट रंगभूमीला लाभले, आणि त्यांनी नाट्यसंगीतात क्रांती करुन ते हिमालयाच्या उंचीवर नेऊन ठेवलं.

या काळातल्या नाटकातल्या गाण्यांची संख्या तुलनेनं कमी झाली. परंतु गायन अमर्याद झाले. संगीताच्या अतिरेकामुळे रंगभुमीची जी हानी झाली त्यावर सुप्रसिध्द समिक्षक बाबुराव जोशीनी मल्लीनाथी केली की, "संगीताने प्रथमतः रंगभूमी गाजली खरी, परंतु तीच रंगभूमी अमर्याद संगीतामुळे नंतर गांजली." पु. ल. देशपांडे या संदर्भात म्हणाले की, "शिरा तोच पण सत्यनारायणाचा प्रसाद होऊन आल्यावर आपण द्रोणभरच देतो. तिथं काही बश्या भरभरुन शिरा मिळावा अशी अपेक्षा नसते. सत्यनारायणाच्या शिऱ्यावर आडवा हात मारायचा नसतो. कारण पदार्थ तोच असला तरी त्याची भूमिका निराळी असते. रंगभूमीवरील या काळातल्या गाणाऱ्या नटांनी हे तारतम्य पाळलं नाही."

संगीताचा अतिरेक केल्याचा परिणाम असा झाला की त्यातलं नाटक आणि अभिनय दोन्हीही आक्रसून गेले. नाटक पाहून आल्यावर नाटक आणि अभिनय चांगला झाला असं म्हणण्याऐवजी बालगंधर्व काय विलक्षण गायले आणि दीनानाथराव काय आक्रमक गायले, असे उदगार प्रेक्षक काढू लागले. म्हणजे नाटक पाहायला जायचं ते गाणं ऐकण्यासाठी, त्यातील नाट्य किंवा अभिनय पाहण्यासाठी नव्हे, असं व्हायला

लागलं.

मामा वरेरकरांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिलं आहे की सुरुवातीच्या काळात बालगंधर्व अभिनयापुरतं किंवा नाट्याला पोषक असच गात असत. परंतु सवाई गंधर्व रंगभूमीवर फार गायला लागल्यामुळं बालगंधर्वांनीही आपलं गाणं वाढवलं. बरं, त्यांचं गाणं काय कमी प्रतीचं होतं ? मुळीच नाही. बालगंधर्व तर असं विलक्षण गात की त्यांचं गायन ऐकायला अल्लादिया खाँसाहेबांसारखे गायक नाटकाला येऊन बसत असत. नंतरच्या काळात छोटा गंधर्व सोडून असे गायक झालेच नाहीत.

नंतरच्या काळात रंगभूमीवरील पुष्कळसे गायक बालगंधर्व किंवा दिनानाथराव यांच्या गायकीचं अनुकरण करु लागले. बरेचसे गायक त्यांच्या गुणांचं अनुकरण करायच्या ऐवजी त्यांच्या दोषांचं अनुकरण करुन आपण बालगंधर्व किंवा दीनानाथराव यांची गायकी गातो असा टेंभा मिरवायला लागले. परिणामत: संगीताचं (नाट्य संगीताचं) अक्षरश: डबकं झालं. गायन कलेची वृध्दी आणि उत्कर्ष व्हायचा असेल तर ती प्रपातासारखी वाहती असायला हवी. नवनवीन स्त्रोत, नवनवीन विचार, नवनवीन ओघ त्यात मिसळले पाहिजेत. तसं झालं नाही, त्यामुळे नाट्यसंगीताचा खळाळता प्रवाह अडून बसला.

१९४२ नंतर कुलवधू वगैरे नाट्यनिकेतनच्या नाटकात ज्योत्स्नाबाई भोळ्यांनी शास्त्रीय संगीतावर आधारीत भावगीत गायन करुन आणि त्यानंतरच्या काळात छोटा गंधर्वांनी आपल्या वेगळ्या गायकीनं नाट्य संगीताचा अडलेला प्रवाह बराचसा मोकळा केला.

खऱ्या अर्थानं नाटकाला छेद न देता नाटकांबरोबर समांतर रेषेत जाण्याच नाट्यसंगीत निर्माण केलं ते १९६० साली आलेल्या पंडीतराज जगन्नाथ नाटकानं. त्यानंतर १९६० ते १९८५ या काळात आलेल्या नाटकात वसंतराव देसाई, छोटा गंधर्व, राम मराठे, नीळकंठ अभ्यंकर, प्रभाकर भालेकर वगैरे संगीतकारांनी फार चांगल्या चाली दिल्या.

१९६४ नंतर पं. जितेंद्र अभिषेकी यांनी आपल्या कल्पक आणि शास्त्रीय संगीतावर आधारीत चाली देऊन नाट्यसंगीताला प्रवाही आणि खळाळतं असं स्वरुप दिलं.



पुन्हा १९८५ नंतर संगीत नाटकांचा आणि नाट्यसंगीताचा अंधार सुरु झाला. त्यामुळं बरेचसे शंकेखोर लोक शंकाकुल होऊन नाट्य संगीत कालबाह्य झालं आहे का ? का ते कुवतबाह्य झालं आहे ? अशी विचारणा करु लागले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की तसं काही झालेलं नाही.

पं. भास्करबुवा बखले पं. रामकृष्णबुवा वझे, गोविंदराव टेंबे, मा. कृष्णराव यांनी नाट्यसंगीताच्या लावलेल्या रोपांचं बाल गंधर्व, दीनानाथराव, बापूसाहेब पेंढारकर यांच्या उत्कृष्ट गायनामुळं वटवृक्ष झाले आणि त्या वटवृक्षाची पाळेमुळे मराठी मनाच्या गाभाऱ्यात खोलवर गेली आहेत. नाट्यसंगीत मराठी माणसाच्या जीवनात एवढ खोलवर रुजलं आहे की ते महाराष्ट्रातून हद्दपार होणच शक्य नाही.

मी माझा अनुभव सांगतो. गेल्या चार-पाच वर्षांत बऱ्याच नाटयसंगीताच्या कार्यक्रमात भाग घेण्याची संधी मला प्राप्त झाली. हे कार्यक्रम पुणे, नाशिक, नगर, रत्नागिरी, चिपळूण, नागपूर, अमरावती, अकोला, औरंगाबाद अशा महाराष्ट्रातील अनेक शहरात झाले. या कार्यक्रमांना मिळालेला उदंड प्रतिसाद पाहून नाटयसंगीत लोप पावलं आहे किंवा नामशेष झालं आहे, असं मला मुळीच वाटत नाही. हल्लीच दूरदर्शनच्या सहयाद्री वाहिनीतर्फे झालेल्या अंतिम स्पर्धेत परिक्षक म्हणून गेलो होतो. सर्व स्पर्धक वेगवेगळ्या शहरातले होते. भावगीत, लावणी वगैरे गायन प्रकाराव्यतिरिक्त प्रत्येकानं एक नाटयसंगीत म्हटल होतं. त्यांचं नाटयसंगीत ऐकून मी प्रभावित झालो.ऐवढया तादात्म्यतेनं आणि परिणामकारकरित्या ते गायले की त्यांची गाणी ऐकून मी स्तंभित झालो आणि मरगळलेल्या माझ्या मनाला उभारी झाली. मराठी जनमानसातून नाटयसंगीत कधीही हद्दपार होणार नाही, याची खात्री पटली. पुणे मुंबईतच नव्हे तर इतर शहरातसुध्दा असे गायक आहेत हे पाहून मन अक्षरक्ष: उचंबळून आले.

मराठी माणसांना नाट्यसंगीत एवढ आवडत असूनसुध्दा संगीत नाटकं चालत नाहीत, ती पुनरुज्जीवीत करायला काय करायला हवं याच विवेचन मी करतो.

१) मर्म बंधात वसलेली संगीत रंगभूमी पुन्हा उजळवून टाकायची असेल तर त्यासाठी काही ठोस उपाय करण्याची गरज आहे. आज संगीत रंगभूमीवर जी थोडीफार नाटके अस्तित्वात आहेत ती पहायला प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकच जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी येत असतात. परंतु संगीत नाटकाकडे तरुण प्रेक्षकांनाही आकर्षित

करुन घेण्याचे इप्सित साध्य होण्यावर या रंगभूमीचे भवितव्य अवलंबून आहे. संगीत नाटकाकडे तरुण प्रेक्षकांना आकर्षित करुन घ्यायचे असेल तर सध्याच्या रंगभूमीचे जुने स्वरुप नाहीसे करुन तिला नवे रुप द्यायला हवे. सौभद्र, मानापमान, विद्याहरण, शारदा, संशयकल्लोळ इ. लोकप्रिय संगीत नाटकांच्या गुवत्तेचे नवे दर्शन घडवायला हवे. सर्वप्रथम, या नाटकांच्या संहिता संपादित करुन त्या नेटक्या आणि प्रयोगशील करायला हव्यात. त्याचप्रमाणे गाणीही मोजकीच घ्यायला हवीत. नव्या तरुण गायक अभिनेत्यांना प्राधान्य देऊन, प्रयोगाचे सादरीकरणही नाविन्यपूर्ण असायला हवे. नेत्रसुखद रंगाच्या वेशभूषेतून सौंदर्याचा अविष्कार घडवायला हवा. नेपथ्यही सूचक व आवश्यक तेवढेच उभे करुन खास प्रकाशयोजनेने वातावरण निर्मिती करायला हवी. थोडक्यात पूर्वीच्या प्रयोगातील ढोबळपणा व बटबटीतपणा बाजूला सारुन संपूर्ण प्रयोगाला सौंदर्यपूर्ण व कलात्मक रुप दिले गेले तरच जुन्या नाटकांचे हे प्रयोग प्रेक्षकांना भावतील, आनंदून टाकतील.

२) जुन्या दुर्लक्षित संगीत नाटकांचा शोध घेऊन, त्यांच्या नव्या रंगावृत्या करुन त्या प्रयोगक्षम करायला हव्या. उदा. मास्टर दीनानाथांनी एकेकाळी गाजवलेलं विश्राम बेडेकर यांच्या "ब्रम्हकुमारी" या संगीत नाटकाची तीव्रतेने आठवण होते. पौराणिक कथेच्या माध्यमातून आजच्या जीवनातील नैतिक प्रश्न मांडणारे आणि अंतर्यामी आधुनिक असलेले हे नाटक आहे. त्यात "नाटक" आहे आणि "संगीतही" आहे. नेटका प्रयोग झाला तर आजही हे नाटक लोकप्रिय होण्याची शक्यता आहे. अशा विस्मृतीत जाणाऱ्या संगीत नाटकांचा शोध घेऊन ती नव्या स्वरुपात सादर करायला हवीत.

३) संगीत नाटक थंडावण्याचे प्रमुख कारण म्हणजे संगीत नाटकांच्या संहितांचा अभाव हे आहे. नवीन संगीत नाटकं केली जात नाहीत, कारण ती लिहिली जात नाहीत, आणि ती लिहीली जात नाहीत म्हणून ती केली जात नाहीत, असं हे दुष्टचक्र आहे. विद्याधर गोखले यांच्यानंतर सातत्याने संगीत नाटके लिहीणारा नाटककार मराठी रंगभूमीला लाभला नाही. यासाठी संगीत नाट्यलेखनाच्या कार्यशाळा भरवून नवीन किंवा प्रचलित लेखकांना संगीत नाटकं लिहिण्यास प्रवृत्त करायला हवे. त्यासाठी संगीत नाटक म्हणजे काय, ती कशी लिहिली गेली पाहिजेत हे समजणे आवश्यक आहे. याबाबतीत माझे विचार थोडक्यांत मांडतो.



कुठल्याही नाटकात गाणी घातली म्हणजे ते संगीत नाटक होत नाही. किंवा तू गाण म्हण मग मी गाण म्हणतो असं सांगून पात्रांनी एकमेकांना म्हटलेल्या गाण्यांनी संगीत नाटक होऊ शकत नाही. संगीत हा नाटकाचा अविभाज्य भाग असायला हवा. त्या नाटकातूनच गाणी वजा केली तर ते नाटकच अशक्य व्हायला हवे. उदाहरण द्यायचच झालं तर जुन्या सौभद्र, शारदा, मृच्छकटिक वगैरे नाटकातील काही गाणी वगळली तर ते नाटकच पुढे जात नाही, कारण त्या गाण्यामध्ये, नाटकाचा अंतर्भाव असतो. एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की नाटकासाठी संगीत असावे, संगीतासाठी नाटक नसावे. हा संगीत नाटकाबद्दलचा विचार सर्वाधिक महत्वाचा आहे. आणि ही गाणी अशी हवीत की प्रत्यक्ष प्रयोगातूनच त्यांची गुणवत्ता, रसवत्ता आस्वादायला मिळावी.

आणखी एक महत्वाची गोष्ट. साधारणपणे अशी समजूत आहे की संगीत नाटकाचा विषय पौराणिक किंवा काल्पनिक किंवा लाईट कॉमेडी असावा ही समजूत मुळी चुकीची आहे. कुठल्याही विषयावर, वातावरणावर किंवा संघर्षात्मक विषयावर संगीत नाटक होऊ शकते. याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे जुन्या पिढीतले संगीत "एकच प्याला" आणि आधुनिक काळातली मत्स्यगंधा आणि ययाती आणि देवयानी ही नाटके संघर्षात्मक विषय असूनही संगीत नाटके म्हणून गाजली होती.

सर्वात महत्वाचे म्हणजे संगीत नाटक हे आनंदाचे आणि सुगंधाचे सुख निधान असायला हवे. प्रसन्नतेने आनंदाचा शोध घेणे हे संगीत नाटकाचे अंतिम ध्येय झाले तर संगीत नाटक निखळ आणि स्वच्छ करमणूक देऊ शकेल आणि प्रेक्षकांची रंजकतेची, अभिरुचीची प्रतिष्ठित भूक भागवू शकेल.

४) पारंपारिक संगीत नाटके ही उत्तमच आहेत, परंतु अशीही काही नाटके आहेत की ज्यांचे संवाद तालबध्द, लयबध्द असतात, काही मुक्त छंदात्मकही असतात. त्या संवादातही गाणं आणि संगीत दडलेल असते. प्रयोगात नृत्य सदृश्य हालचाली ही बसवल्या जातात. "लेकुरे उदंड झाली" "घाशीराम कोतवाल", "तीन पैशाचा तमाशा" ही अशा संगीताची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. पारंपारिक प्रकृतीची नसली तरी Light प्रकृतीची अशी ही उत्तम "संगीतकं" म्हणता येतील, अशा प्रकारची नाटकंही रंगभूमीवर अवश्य यावीत.

५) संगीत नाटकात संगीत कशा प्रकारचं असावं? अभिजात किंवा शास्त्रीय संगीतावर आधारलेले असलं तर फारच उत्तम. फरक एवढाच की शास्त्रीय संगीतावर आधारलेलं आहे म्हणून फार वेळ गाऊन किंवा ताना मारुन चालणार नाही. भाव आणि रसोत्पती साधेपर्यंतच, पण कसदार गायन असावं. सर्वच गायक / गायिकाना शास्त्रीय संगीतात गाणं म्हणणं जमणार नाही म्हणून इतर सुगम संगीताचा उपयोग करुन घ्यायला हवा. सुगम संगीत म्हणजे मला अभिप्रेत आहे ते भावगीत, लावणी, दिंडी, कामदा, लोकसंगीत वगैरे गायनप्रकार. अशा प्रकारचे गायनप्रकार सुरुवातीच्या काळात अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल यांनी आपल्या नाटकात मुक्त हस्ताने वापरले होते. माझ्या मतानं सुगम संगीतानं भाव, भावना आणि रस यांची उत्पत्ती आणि उत्कर्ष चांगल्या प्रकारे साधता येतो. शास्त्रीय आणि सुगम संगीताच्या सुमधुर चाली द्यायला आपल्याकडे उत्तम दिग्दर्शक आहेत. उदाहरणार्थ यशवंत देव, पं. हृदयनाथ मंगेशकर, अशोक पत्की, रघुनंदन पणशीकर वगैरे. महत्वाची गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, उद्याचं नाटक केवळ ज्येष्ठ नागरिकांच्या आश्रयावर चालणार नाही. ते चालायचं असेल आणि अधिकाधिक प्रतिसाद मिळवायचा असेल तर तरुण रसिक वर्गात लोकप्रिय व्हायला हवे. म्हणून अभिजात संगीतावरोबर सुगम संगीताचाही वापर मुक्त हस्ताने व्हावा.

६) सध्या महाराष्ट्र राज्याच्या संगीत नाटकांच्या स्पर्धा होतात, त्यात जुनीच नाटके जुन्याच पध्दतीने सादर केली जातात. मग त्यातल्या त्यात बऱ्या वाटणाऱ्या नाटकाला पारितोषिक मिळून जाते. जुन्या नाटकाचा नाविन्यपूर्ण प्रयोग किंवा सादरीकरण करण्याचा कुणी प्रयत्न करीत नाही. या प्रयत्नातून संगीत रंगभूमीच्या उन्नतीसाठी काही साध्य होत नाही. यासाठी गद्य नाट्यस्पर्धेचा नव्या संहितेचा नियम याही स्पर्धेला लागू करुन नाविन्यपूर्ण संगीत नाटकाच्या प्रयोगालाच पारितोषिकासाठी प्राधान्य द्यायला हवे.

मुद्दाम सांगावेसे वाटते की, १९६० साली धी गोवा हिंदू असोसिएशने राज्य नाट्य स्पर्धेसाठी "मृच्छकटिक" नाटक ३ अंकात बसवले होते. जुन्या नाटकावरुन नवीन संहिता विद्याधर गोखले यांनी केली होती आणि चाली प्रभाकर भालेकरानी थोड्याशा बदलून दिल्या होत्या. त्यात मी चारुदत्ताची भूमिका केली होती. हे नाटक मान्य झाले होते.



७) महाराष्ट्रात एकही शहर असे नाही की जिथे एकांकिका स्पर्धा होत नाहीत. आता संगीत एकांकिकांच्या स्पर्धा कुणीतरी आयोजित करुन त्याला घवघवीत पारितोषिके ठेवायला हवीत.

बालरंगभूमीच्या संदर्भात म्हणजे संगीत बाल नाट्यांच्या स्पर्धा आयोजित करायला हव्यात.

८) बरेचसे शास्त्रीय संगीत गायक आपल्या शिष्यांना नाट्यसंगीत गाण्यापासून परावृत्त करतात. नाट्यसंगीतात सूर, शब्द आणि मुख्यत्वेकरुन भाव यांचा योग्य मिलाफ करण्यासाठी रागातल्या एखाद्या वर्ज्य स्वराचा आधार घ्यावा लागतो. कडव्या किंवा सनातनी वृत्तीच्या संगीतकारांना हे मान्य नाही म्हणून आपल्या शिष्याला शास्त्रीय संगीत शिकवताना नाट्यसंगीत अशिव आहे, त्याज्य आहे असं सारखं त्यांच्या मनावर बिंबवत असतात. यातले काही संगीतकार तर लबाड आहेत. आपण नाट्यसंगीत गात नाही असा ढोल बडवत असतात. पण आपलं संपूर्ण शास्त्रीय संगीत लोक ऐकून घेत नाहीत असं पाहिल्यावर मग नाट्यसंगीत गातात. म्हणजे त्यांना गावच लागतं. यासाठी त्यांनी आपला दुराग्रह सोडून द्यावा आणि आपल्या शिष्यांना नाट्यसंगीत गायला प्रतिबंध करु नये.

९) नाटकातलं संगीत गायला आवाजाला फोकस असावा लागतो. प्रयत्न केल्यास आवाजाला फोकस असणारे गायक-गायिका मिळू शकतील.

१०) संगीत नाटकाच्या उर्जितावस्थेसाठी महाराष्ट्रात काही संस्था आपल्या मगदूराप्रमाणे कार्यरत आहेत. आर्थिक यशापयशाचा विचार न करता प्रसंगी पदरमोड करुन काम करीत आहेत. पुण्याची भरत नाट्य संशोधन मंदिर, शिलेदारांची मराठी रंगभूमी, बाल गंधर्व रसिक मंडळ, मुंबईची मराठी साहित्य संघ, नेहरु सेंटर, विद्याधर गोखले प्रतिष्ठान, वगैरे सारख्या संस्था मनात इच्छा असूनही आर्थिक पाठबळ नसल्याने नवीन संगीत नाटकांची निर्मिती करू शकत नाहीत. या संस्थांना नवीन संगीत नाटकांची निर्मिती करण्यास प्रवृत्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ठराविक निर्मिती खर्च देण्याची योजना आखावी अशी मी सूचना करतो. त्यासाठी या संस्थानी नाटकाची नवीन संहिता नाट्य परिषदेने नेमलेल्या समितीकडून प्रयोगक्षम असल्याचा दाखला घ्यावा अशी शासनाने अट घालावी. त्याशिवाय या नाटकाचे कमीत कमी दहा-पंधरा तरी प्रयोग करायला पाहिजे अशी सक्ती करावी. असे दहा-पंधरा तरी प्रयोग

ानंतरच विशिष्ट निर्मिती खर्च देण्याची शासनाने तयारी दर्शवावी. नवीन ांची निर्मिती केल्यास शासन देत असलेल्या अनुदानाच्या अटीही या नवीन ाच्या बाबतीत थोड्या शिथील कराव्या असे मला वाटते.

संगीत नाटकाच्या उर्जितावस्था व उन्नतीसाठी मी एक महत्वाची सूचना करु तो. नव्या संगीत नाटकाच्या उभारणीसाठी आज सर्वाधिक गरज आहे ती ीय पातळीवर "स्कूल ऑफ म्युझिकल ड्रामा" ची (SMD). असे विद्यालय .D. च्या धर्तीवर स्थापन करण्याची गरज आहे.

नाट्यशिक्षणाचे अभ्यासक्रम विद्यापिठातर्फे आता घेतले जातात. पण याही नाट्यविद्यापिठात संगीत नाटकाचा वेगळा विभाग नाही. त्यासाठी संगीत ांचा आणि त्याच्या प्रयोगांचा स्वतंत्र विचार किंवा अभ्यास केला जात नाही. या पीठातील परिक्षार्थी परिक्षेसाठी म्हणून संगीत नाटकांचा प्रयोग सादर करत त. ही त्रुटी संगीत नाटकांवरच भर देणारे वेगळे (SMD) विद्यालय स्थापन तरच भरुन काढता येईल. शिक्षण व्यवसायाभिमूख असेल तरच विद्यार्थ्यांचा ते प्राप्त करण्याकडे असतो. केवळ कलेसाठी कला आत्मसात करुन घेण्याचे संपले आहेत. तो भाबडा आदर्शवाद ठरेल म्हणूनच म्युझिकल ड्रामा मधल्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी एक रंगमंडळ (रेपरटरी) उभारणे आवश्यक . गुणी विद्यार्थ्यांचे सुविहित संगीत नाटकांचे प्रयोग या रंगमंडळातर्फे महाराष्ट्रभर महाराष्ट्राबाहेर होत राहतील, आणि संबंधित सर्व कलावंतांना त्यासाठी घवघवीत / मानधन द्याव लागेल, तसं झालं तर त्या कलावंतांच्या उपजिविकेचा प्रश्न आणि आपला कलाविष्कार ते अधिकाधिक विकसित करु शकतील.

ज्या रंगकर्मींना अशा रंगमंडळाकडून संधी मिळणार नाही त्यांच्यासाठी संगीत क्षेत्रातलेच पार्ट टाईम जॉबस् उपलब्ध करून दिले पाहिजेत. संगीत शिक्षक, शाळा घेणे, संगीताचे कार्यक्रम आयोजित करणे, कार्यक्रमाचे निवेदन करणे दी कार्यक्रमातून आपल्या प्राप्त ज्ञानाचा आणि गुणवत्तेचा योग्य उपयोग त्याना ा येईल आणि त्याचवेळी त्यांना अर्थप्राप्तीही होऊ शकेल.

शेवटी मी सांगू इच्छितो की मी कुणी नाट्यतज्ञ नाही वा नाट्यअभ्यासकही . गायक नटाची भूमिका इमाने इतबारे वठवणारा मी एक कलावंत आहे. त्यामुळे हे बोल कुणाला हवेतले वाटतील, भासमय वाटतील, स्वप्निल वाटतील, पण



माझी खात्री आहे की, माझे हे मनोवांच्छीत कालांतराने सत्यात उतरेल !

रसिक हो, मराठी संगीत रंगभूमीचा मी निष्ठावंत सेवक आहे. रंगभूमीवर जवळजवळ पंचवीस संगीत भूमिका मी केल्या त्या प्रेक्षकांना आवडल्या. त्यांनी माझं मन: पुर्वक अभिनंदन केलं. आजपर्यंत अनेक मानसन्मान मला मिळाले आणि आज मराठी नाट्यक्षेत्रातील सर्वोच्च मानाने माझ्या नाट्यसेवेचा गौरव झाला.

ज्या निष्ठेने मी या क्षेत्रात आलो आणि वावरलो, ती माझी निष्ठा कधीही ढळणार नाही. रंगभूमीची सेवा मी अशीच यापुढेही करीत राहीन.

नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष हे मानाचं स्थान असलं तरीसुध्दा मराठी नाट्यपरिषदेतर्फे होणाऱ्या कार्यात माझ्याजोगतं काम या अध्यक्षीय कारकिर्दीत होण्यासारखं असेल तर ते माझं काम म्हणून मी आनंदान पूर्ण करीन.

गेली चार तपं संगीत रंगभूमीची सेवा करणारा मी नटेश्वराकडे अशी प्रार्थना करतो की मराठी रंगभूमीवर होणाऱ्या नव्या जुन्या सर्व नाटकाना यश मिळो. माझ्या आवडत्या संगीत रंगभूमीला पुन्हा नवसंजीवनी मिळो.

यासाठी मी नटेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो.

सर्वात्मका सर्वेश्वरा, गंगाधरा, शिवसुंदरा
जे जे जगी जगते तया, माझे म्हणा करुणाकरा ॥ धृ ॥
आदित्य या तिमिरात व्हा, ऋग्वेद या हृदयांत व्हा
सुजनत्व द्या, द्या आर्यता, अनुदारता दुरिता हरा ॥

कवि – वि. वा. शिरवाडकर